**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.५०/२०२५**
**द्रौपदी उर्फ द्रौपदाबाई वि. दिपाली व इतर**

**<u>निशाणी क्र. ०१ वरील आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी मयत नानासाहेब राजाराम बोडके यांचे वारस असल्याचे घोषित करुन मिळणेकामी दाखल केलेला आहे. प्रस्तुत प्रकरणारत गैरअर्जदार क्र. १ ते ३ हजर होवून नि.क्र. १७ अन्वये प्रस्तुत अर्ज स्थगित करावा अशी मागणी केली आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदार यांनी नि.क्र. ०४ वरील यादीसोबत दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३७/२०१७ या अर्जाचे नि.क्र. ०१ व त्यावरील आदेशाची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. सदर किरकोळ अर्जाचे अवलोकन केले असता प्रथमदर्शनी असे दिसून येते की, गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांनी मयत नानासाहेब राजाराम बोडके यांची पत्नी व मुले या नात्याने वारस घोषित करुन मिळणेकामी न्यायालयात अर्ज दाखल केला होता व सदरचा अर्ज न्यायालयाने मंजूर केला असून गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांना सदर मयत नानासाहेब राजाराम बोडके यांचे वारस घोषित केलेबाबतचे वारस प्रमाणपत्र देण्यात आले असल्याचे दिसून येते.

०२. सदर अर्जदार यांनी दाखल केलेल्या मयत नानासाहेब राजाराम बोडके यांच्या मृत्यू प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता सदर मयत नानासाहेब राजाराम बोडके यांच्या आईचे नाव द्रौपदाबाई राजाराम बोडके असे नमूद असल्याचे दिसून येते. सदर मयतीची आई ही प्रस्तुत अर्जातील अर्जदार आहेत. यावरुन गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांनी सदर मयत नानासाहेब यांचे वारस घोषित करुन मिळणेकामी दाखल केलेल्या दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३७/२०१७ यामध्ये मयत नानासाहेब यांची आई म्हणजेच अर्जदार ही हिंदू वारसा कायदा अन्वये वर्ग–१ मधील वारस असताना त्यांना सदर अर्जात समाविष्ट न करता त्यांचे उपरोक्ष सदर मयताचे वारस प्रमाणपत्र घेतले असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. प्रस्तुत अर्जात आता मयताच्या आईने सदर मयताचे वारस आहे असे घोषित करुन मिळणेकामी मागणी केली आहे. त्यामुळे, न्यायालयाने गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांना देण्यात आलेले मुळ प्रमाणपत्र अभिलेखावर येणे आवश्यक आहे. सबब, खालील प्रमाणे आदेश–

# आदेश

गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांनी दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३७/२०१७ मधील नि.क्र. ०१ वरील आदेशाप्रमाणे त्यांना न्यायालयामार्फत देण्यात आलेले मयत नानासाहेब राजाराम बोडके यांचे मुळ वारस प्रमाणपत्र अभिलेखावर पुढील तारखेस सादर करावे.

ANAY DNYANESH KULKARNI

Digitally signed by ANAY DNYANESH KULKARNI
Date: 2026.03.18 16:38:38 +0530

दिनांक – १८/०३/२०२६

(**अनय ज्ञा. कुलकर्णी**)
तिसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
माढा

| **CERTIFICATE** | | |
|---|---|---|
| I affirm that, the contents of this P.D.F. file Order/Judgment is same word to word, as per the original order/judgment. | | |
| Name of Stenographer | : | M.P.Dixit Grade-3 |
| Court Name | : | 3rd Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Madha. |
| Order/Judgment signed by the Presiding Officer on | : | 18/03/2026 |
| Order/Judgment uploaded on | : | 20/03/2026 |